अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा सरतपास
मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांव :– सुरेखा सुनिल ताटे, वय :– ३३ वर्षे,

धंदा :– नोकरी, राहणार :– दोडामार्ग.

**<u>सरतपास सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. व्ही. पेडणेकर यांचेकडून सुरु</u> –**

दि.०४.१२.२०२४ रोजी मी तळेखोल येथे बी.आर. फार्म येथे गेले होते. मी, दुसरे पंच, पोलीस पाटील व सुयोग चौगुले असे गेलो होतो. आम्ही तेथे गेलो तेव्हा आम्हाला लोखंडी गेट दिसले. आतमध्ये गेल्यानंतर पुर्वेला बी.आर. फार्मचे ऑफिस व स्वीमींग पुल दिसले. तसेच दक्षिणेला फार्म हाऊसची इमारत दिसली व पश्चिमेला फळबाग दिसली. त्याठिकाणी ग्रीन नेटची शेड होती. त्याठिकाणी पोलीसांनी पंचनामा केला. आम्ही त्या ठिकाणी सरांबरोबर पंचनामा केला. आता मला आमच्या समक्ष झालेला पंचनामा दाखवला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यावरील अ.क्र.१ वरील सही माझी आहे. सबब, त्यास **निशाणी क्र. P–1/PW1** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस्. पी. देसाई यांचेकडून सुरु</u> –**

२) मी सन २०११ पासून ग्रामपंचायत व त्यानंतर नगरपंचायतमध्ये लिपिक म्हणुन काम करते. माझी नोकरी कायमस्वरुपी आहे. हे म्हणणे खरे आहे की, नोकरीवर असताना चालु दिवसामध्ये बाहेर जायचे असल्यास आमच्या मुख्य

अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला कार्यालयाबाहेर जायचे असल्यास आमच्या आवक–जावक रजिस्टरमध्ये कोणत्या कारणासाठी व किती वेळासाठी बाहेर जात आहे, याची नोंद करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, दि.०४.१२.२०२४ हा नगर पंचायतीचा कामाचा दिवस होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी मी कार्यालयात सुट्टी घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या दिवशीचा पुर्ण पगार घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, नगर पंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांचा कार्यालय सोडण्याचा लेखी आदेश माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशीच्या आवक–जावक रजिस्टरमध्ये मी कार्यालय सोडुन बाहेर गेल्याची नोंद नाही.

३) आम्ही जे चार जण गेलो होतो त्यामध्ये कोणीही वर्दी घातलेली व्यक्ती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यापैकी गळयामध्ये ओळखपत्र घातलेला देखील कोणीही व्यक्ती नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी सुयोग चौगुलेला वैयक्तीक ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या सोबत असलेला व्यक्ती सुयोग चौगुले आहे किंवा कसे, याची खात्री मी त्याचे आधारकार्ड किंवा ओळखपत्र पाहुन केली नव्हती.

४) हे म्हणणे खरे आहे की, आपल्या ग्रामीण भागात जमीनीच्या मालकाचे नाव व सर्व्हे नंबर असलेली पाटी लावलेली नसते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे कोणती जमीन कोणाच्या मालकीची आहे व कोणत्या सर्व्हे नंबरची आहे, हे सांगता

येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जे कथीत घटनास्थळ सांगितले, त्याचा सर्व्हे नंबर मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या सातबाऱ्याचे क्षेत्र किती आहे, त्याची आकारणी किती आहे तसेच मालक किती आहेत या बाबत देखील मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला त्या जमीनीचा नकाशातील आकार देखील माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी नक्की कुठे गेले होते हे मला सांगता येणार नाही.

५) हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या अलीकडे असलेल्या घराचा रंग मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळावरील फार्म हाऊसच्या समोरील तुळशी वृंदावन रस्त्याच्या डाव्या बाजुला का उजव्या बाजुला आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या तुळशी वृंदावनाला कोणता रंग आहे, हे देखील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जे घर सांगितले त्या घराच्या दरवाजावर स्वामी समर्थांचा फोटो आहे का साईबाबांचा फोटो आहे का नरेंद्र महाराजांचा फोटो आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

६) हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पोलीसांना सांगितले व पोलीसांनी लिहुन घेतले असे काही घडले नाही. हे मला माहित नाही की, सदरच्या पंचनाम्यामध्ये जे अक्षांश व रेखांश लिहीलेले आहेत ते सत्तरी, गोवा या ठिकाणचे आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस जे लिहीतील ते बरोबर असेल

असे वाटल्याने मी सदरचा मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, नगर पंचायतमध्ये येणाऱ्या लोकांशी मी उर्मटपणे वागल्यामुळे माझ्या विरुद्ध पोलीस ठाण्यात असलेल्या तक्रारी संबंधात मी पोलीस ठाण्यात गेले असता तयार पंचनाम्यावर पोलीसांनी माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कथीत तारखेला बी.आर. फार्म येथे गेले होते व माझ्या सोबत दुसरे पंच, पोलीस पाटील व सुयोग चौगुले असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी जाऊन पंचनामा केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या विरुद्ध असलेल्या तक्रारीमुळे माझ्या विरुद्ध कोणतीही कारवाई करु नये म्हणुन मी तयार पंचनाम्यावर सही करुन आज रोजी पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/–

ठिकाणः– दोडामार्ग.

दिनांकः– १५/०७/२०२६.

(आर. आर. भगत)

न्यायदंडाधिकारी वर्ग–१, दोडामार्ग.